**MHKO100006502022**

नियमीत दिवाणी दावा क्र. १६९/२०२२ मध्ये निशाणी १०० वर आदेश

सदर अर्ज वादी यांनी दिनांक ११.०२.१९८८ रोजीचे मुळ करारपत्र प्रतिवादी यांच्या ताब्यात असल्याने ते त्यांनी न्यायालयात हजर करावे याकरीता दाखल केला आहे. सदर अर्जास प्रतिवादी यांनी निशाणी २०३ वर म्हणणे दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, दिनांक ११.०२.१९८८ रोजीच्या दस्त झालेबाबत प्रतिवादी यांनी कैफियतीमध्ये स्पष्टपणे नाकारले आहे. वादी यांनी पुराव्यामध्ये त्याच्याकडील तथाकथित दस्त हा मुळ असल्याचे कथन करून पुराव्यामध्ये शाबीत करणेचा अयशस्वी प्रयत्न केला आहे. वादी यांनी सदर तथाकथित दस्त प्रतिवादी यांच्या ताब्यामध्ये असल्याबाबत कथन दाव्यात केले नाही. दाव्यातील कथन व दस्तऐवज सिद्ध करण्याची जबाबदारी वादीची आहे. ती जबाबदारी प्रतिवादीवर ढकलणे कायदेशीरदृष्टया चुकीचे आहे. वादी यांना पुरेशी संधी देवून त्यांनी त्यांचा पुरावा संपलेबाबत पुरसीस दाखल केली आहे. त्यामुळे सदर अर्ज कायदयाप्रमाणे चालण्यास पात्र नाही. म्हणून नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

२. दोन्ही बाजूंचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या अर्जातील व म्हणणेतील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला.

३. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी दाव्यात दिनांक ११.०२.१९८८ रोजीचा दस्त त्यांचे व प्रतिवादीचे पुर्वहक्कदार यांच्यामध्ये झालेबाबत कथन करून त्या दस्तातील मजकूर नमूद केला आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये असा कोणताही दस्त झाला नाही तसेच त्या दस्तावर प्रतिवादीचे पुर्वहक्कदार यांची सही नाही असे कथन केले आहे. वादी यांनी वर्णन यादी निशाणी क्र. ३ अ.क्र.२ सोबत दाखल केलेल्या दिनांक ११.०२.१९८८ रोजीच्या दस्ताच्या छायाकिंत प्रतीचे अवलोकन केले असता तो दस्त वादी यांचे पुर्वहक्कदार आणाप्पा कल्लोळी यांनी प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार बाबूराव कल्लोळी यांना लिहून

दिल्याचे दिसत आहे. त्या दस्ताची झेरॉक्स प्रत वादी यांचे पुर्वहक्कदार यांच्याकडे देण्याची असून मुळ प्रत प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार यांच्याकडे ठेवण्याची आहे असे नमूद केले आहे. सदर दस्त सिद्ध करण्याकरीता वादी यांनी या दस्तावरील साक्षीदार विष्णू आप्पा निलवे यांची साक्ष निशाणी ६९ वर नोंदवली आहे. त्यामध्ये त्यांनी या दस्तावर त्यांची सही साक्षीदार म्हणून आहे असे कथन केले आहे. त्यावेळी सदर दस्त मुळ असल्याने त्यास निशाणी देण्यात यावी असे वादीचे विधीज्ञ यांचे मत होते. परंतु तो दस्त छायाकिंत प्रत असल्याने त्यास निशाणी देवून पुराव्यात वाचण्यात आला नाही. त्यानंतर वादीने त्यांचा पुरावा पुर्ण झाल्यानंतर दिनांक १८.०८.२०२५ रोजी पुरावा संपलेबाबत पुरसीस दाखल केली व त्याचदिवशी सदर अर्ज दाखल केला.

४. वरील सर्व चर्चेनुसार असे दिसून येते की, प्रतिवादी यांनी दिनांक ११.०२.१९८८ रोजी दस्त झाल्याचे नाकारले आहे. परंतु दस्तात नमुद केल्याप्रमाणे मुळ दस्त प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार यांच्याकडे देण्याबाबत कथन नमूद आहे. त्यामुळे मुळ दस्त प्रतिवादी यांच्या ताब्यात असण्याची शक्यता आहे. त्यामुळे भारतीय पुरावा कायदा कलम ६६ नुसार दिनांक ११.०२.१९८८ रोजीचा मुळ दस्त याकामी हजर करण्यास प्रतिवादी यांना आदेशीत करण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.09.04 16:11:31 +0530

दिनांक ०४.०९.२०२५

डी. एम. पवार
२रे दिवाणी न्यायाधीश क.स्तर
गडहिंग्लज